शिवनेरीचा परिसर



श्री. द. वा. मांडे
न्यू स्कूल, जुन्नर

शिवाई देवी

जन्मस्थान


शिवकुंज


हत्ती दरवाजा

कडेलोट

शिवजन्म स्थानाचा विहंगम परिसर


तटबंदी

गणेश दरवाजा


बालेकिल्ला

जुन्नर तालुका

खाजगी वितरणासाठी -

शिवनेरीचा परिसर

द.वा. मांडे

न्यू स्कूल, जुन्नर

जुन्नरचा परिसर-सद्यःस्थिती-गतवैभव-जुन्नर नांव कसे पडलें-जुना कोट-व्यापारी पेठ-शिवनेरी गड-इतिहास-गडावरील वास्तू-लेणी व शिलालेख-लेण्याद्रि, अंबाअंबिका, तुळजालेणी-नाणेघांट-ऐतिहासिक, सांस्कृतिक व सामाजिक महत्व

- सरस्वती स्तवन -

या कुन्देन्दुतुषारहारधवला, या शुभ्रवस्त्रावृता।
या वीणावरदण्डमंडितकरा, या श्वेतपद्मासना ।।
या ब्रह्माच्युतशंकरप्रभुतिभिःदेवै सदा वन्दिता ।।
सा मां पातु सरस्वती भगवती
निःशेष जाड्यापहा ।।
रामो राजमणि सदाविजयते
रामं रमेशं भजे।
रामेणाभिहता निशाचर चमू
रामाय तस्मै नमः ।।

- कृतज्ञता -

''गुरु ब्रह्मा, गुरु विष्णू, गुरु देवो महेश्वरा
गुरु साक्षात परब्रह्म, तस्मै श्री गुरवे नमः''

संयोगाने काही दिवसांपूर्वी एक छोटीसी पुस्तिका वाचनात आली, नाव होतं 'शिवनेरीचा परिसर' आणि जन्मभूमी जुन्नरची नव्याने ओळख झाली. काळाच्या उदरात लुप्त झालेल्या या शहराच्या खाणाखुणा पडद्याआडून डोकावून खुणावू लागल्या. कोठे असतील त्या १२ वेशी ज्यांच्या संरक्षणात हे गाव वसलं? कुठे असतील त्या विहिरी ज्या शहरास पाणी पुरवठा करीत होत्या? असे एक ना अनेक प्रश्न मनात येऊन गेले. शहरातून फिरताना मुद्दाम एखादी जुनी खूण दिसते का? याचा मन शोध घेऊ लागलं आणि मग एकदम मनात एक विचार आला, या पुस्तिकेचं पुनर्मुद्रण करायचं. हा अनमोल ठेवा घराघरात, मनामनात पोहचावा. त्यानिमित्ताने गुरु ऋणातून अंशतः का होईना उतराई होता येईल...कसे? कारण या अभ्यासपूर्ण पुस्तिकेचे लेखक होत गुरुवर्य द. वा. मांडे सर.

कै. श्री. द.वा. मांडे हे उत्तर पुणे जिल्ह्यातील एक नावाजलेली शिक्षण संस्था ''जुन्नर एज्युकेशन सोसायटी, जुन्नर''यामध्ये १९४० पासून विद्यादानाचे पवित्र कार्य करीत होते. संस्थेच्या ''न्यू स्कूल, जुन्नर'' विद्यालयात त्यांनी शिक्षक, पर्यवेक्षक, हेडमास्तर ही पदे भूषविलीत. तसेच संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सभासद, चिटणीस पदावरही ते कार्यरत होते. त्यांच्या चिटणीस पदाचे कार्यकालातच 'प्रेक्षागृह'ही त्याकाळी जुन्नरचे भूषण ठरलेली वास्तू उभारली गेली. तसेच गावाच्या मध्यवर्ती 'खत्री इमारत' ही शाळेची दुसरी इमारत ही सरांचे मार्गदर्शनाखालीच साकारली गेली. शालांत परीक्षा बोर्डामध्येही भूगोल विषयाचे एक्झामिनर, मॉडरेटर, चिफ मॉडरेटर, पेपर सेटर म्हणून सरांनी नाव लौकिक कमावला. शाळेत ते इंग्रजी व भूगोल विषयांचे तज्ञ शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांत प्रिय होते. सुदैवाने मला त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ झाला.

दरवर्षी मे मध्ये शाळेचा माजी विद्यार्थी मेळावा भरतो. त्या मेळाव्यास न

चुकता आवर्जून कै.श्री. मांडे सरांचे थोरले चिरंजीव श्री. शरद दत्तात्रय मांडे हजर असतात. मी त्यांना माझ्या मनीचे विचार ऐकविले आणि त्यासाठी त्यांची अनुमती मागीतली. क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी उदार अंतःकरणाने अनुमती दिली व मोलाचे साहाय्यही केले. सध्या श्री. शरद मांडे हे माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष असून 'ऋणानुबंध' इमारतीच्या वरच्या मजल्याचे काम त्यांचे मार्गदर्शनाखील जवळ जवळ पूर्ण होत आले आहे.

'शिवनेरीचा परिसर' या पुस्तिकेतून जुन्नर व सभोवतीच्या परिसराची सविस्तर माहिती वाचकांना मिळेल. शिवनेरी अनेकांनी अनेकवेळा पाहिला असेल पण या पुस्तिकेच्या वाचनानंतर शिवनेरीचे वेगळे रुप अनुभवायला मिळेल. अंबाअंबिकेचा डोंगर जैन धर्मियांना आकर्षित करील, पद्मावती तळे आणि तळ्याजवळील पद्मावती मातेचे मंदिर इतिहासाची नविन पाने आपणासमोर उघडील व जुन्नरची ओळख होईल.

त्यामुळे पुस्तिकेत जे जे म्हणून चांगले आहे ते

स.न.वि.वि.

सदर पुस्तिकेच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन २३ नोव्हेंबर २००८ ला झाले. अल्पावधीतच अनेकांपर्यंत ते पोहोचले. प्रती संपत आल्याने व अनेकांचा आग्रह असल्याने ही तीसरी आवृत्ती काढण्यात येत आहे. अनेकांना त्याचा उपयोग व्हावा अशी अपेक्षा!

विजय मुथ्था

जुन्नर

पुस्तिकेसंबंधी संपर्क –

श्री. विजय फुलचंद मुथ्था

रविवार पेठ, मु.पो.ता. जुन्नर, जि. पुणे. भ्रमणध्वनी : ९७३०३६७०५३

श्री. शरद दत्तात्रय मांडे

१९, नवकेतन सोसायटी, सर्व्हे नं. १२८/२, कोथरूड, पुणे ४११०२९ (भारत)

दूरध्वनी : ०२०-२५४६०८०८, २५४६१४३०, भ्रमणध्वनी : ९८६०९८२८२५

शिवनेरीचा परिसर

'प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णु: विश्ववंदिता ।।
शाहसूनो: शिवस्येषा मुद्रा भद्राय राजते ।।'

जुन्नरचा परिसर-सद्य स्थिती :

पुणे जिल्ह्याच्या उत्तर परिसीमेवर मांडवी, कुकडी व मीना यांच्या त्रि-आबांतील पश्चिम-पूर्व सुमारें ३५ मैल व उत्तर-दक्षिण सुमारें १६-१७ मैलांत ५३३ चौरस मैलांच्या क्षेत्रास ब्रिटिश अमदानींत जुन्नरच्या अधिपत्याखालील म्हणून, ''तालुके जुन्नर'' ही संज्ञा प्राप्त झाली. तत्पूर्वी ''प्रांत शिवनेरी'' म्हणण्याचाच परिपाठ शेकडों वर्षे रुढ होता. एकूण १४८ गावांपैकी पश्चिमेकडील ६४ गांवे मावळांत व उरलेली पूर्वीकडील ८४ देशभागांत समाविष्ट होतात. एकूण साडेतीन लाख एकर क्षेत्रांतील अडीच लाख एकर लागवडीच्या जमिनीवर कोणकोणतीं पिकें होतात असें विचारण्यापेक्षा कोणती होत नाहीत असेच विचारणे संयुक्तिक होईल. मावळातील उस्तळ भागांतील १५७ नंबरचा उत्कृष्ट गरा-आंबेमोहोर तांदूळ म्हणजे ह्या भागातील पिकांचा राजा. ओतूरच्या जमिनी अखिल महाराष्ट्रांत वरच्या दर्जाच्या, तेथील गहूं व बाजरी रंगदार. येणेरे, निरगुडे, नारायणगांव व ओतूर या जुन्नरच्या परिसीमेंवरील क्षेत्रांत तूर, तीळ, वाल, हरबरे, मूग, मटकी, उडीद, चवळई, कुळीथ अशीं अनेक एक अगर द्विदल धान्यें जुन्नरचा रविवारचा बाजार फुलवून टाकतात. संत्री, मोसंबी, चिक्कू, केळीं, पेरु-आंबे सदासर्वकाळ येथील जनतेचें पूरक अन्न असते. आळ्याची हिरव्या सालीचीं केळी औषधी गुणांनी युक्त, लहान मुलांस अवश्य द्यावीत. बेल्ह्याचे पानमळे व राजुरीची द्राक्षे पूर्वीपासून प्रसिद्ध आहेत.

रत्नागिरीचा हापूस फळांचा राजा-पण चव एकच एक. या भागांतील हापूस आगळाच. साधाच रायवळ घ्या, रोहिदोड्या घ्या, अगर चिराक्या घ्या, त्याची लज्जत त्यालाच. पुण्या-मुंबईचा आंब्यांचा मोसम संपतो त्या वेळी येथील सुरू होतो. अशा ह्या साडेतीन लाख एकरांत साडेतीन लाख शेतसारा सरकार वसूल करतें. तालुक्याची दीड लाख लोकसंख्या म्हणजे कमी मनुष्यबळ नव्हे. तालुक्यांतील

प्रत्येक खेड्यांत प्राथमिक शाळांतून हजारों मुलेमुली शिकत आहेत. जुन्नर, नारायणगांव, ओतूर, पिंपळवंडी, राजुरी, आळें, आणे अशा अनेक माध्यमिक शाळांत हजारो मुलेमुली शिक्षण घेत आहेत. अनेक सहकारी संस्था खेड्यांशी संलग्न झालेल्या आहेत. गेल्या १५-२० वर्षांत जुन्नर तालुक्यात कुकडी प्रकल्पांतर्गत माणिकडोह, वडज, येडगांव, पिंपळगांव जोगा, चिल्हेवाडी आदी धरणांमुळे सिंचनाची चांगली सोय झाली आहे.

अणे-माळशेज या राष्ट्रीय महामार्गामुळे मुंबई जवळ आली आहे. हिवऱ्याची बाग व शिवनेरीच्या पूर्वउतारावरील राष्ट्रीय-उद्यान योजना तालुक्याची शान वाढविणार आहेतच. सुमारे *अडीच हजार फूट उंची, जेमतेंम पण निश्चित असा ३० इंच पाऊस व महाराष्ट्रातील उत्तम प्रतीचें आल्हादकारक हवामान व विविध पिकांचा हा भाग, ख्रिस्तसनापूर्वीपासून प्रसिद्ध आहे. ज्यांचा इतिहास उज्वल त्यांचा भविष्यकाळही उज्वल होण्यास अडचण काय? अस्ताचलावर आषाढाच्या प्रथम दिवसापासून धुवांधार पर्जन्यवृष्टीमुळे तीनही नेरें बुडून जातात. मावळांतील दऱ्याखोऱ्यांतील खंडोगणती गाळ महापुराने वाहून नेला जातो व उन्हाळी महिन्यांत पाण्याअभावीं मुलुख उजाड होतो. चैतन्य, मग तें निसर्गातील असो अगर मानवांतील असो, तें लोपलेले नाही. स्फुलिंगाप्रमाणे दडून आहे. उणीव आहे ती, योजनाबद्ध आखणीची व सचोटीच्या नेतृत्वाची. यांची जोड ह्या सुवर्णभूमीस मिळाल्यास गतवैभव पुन्हा प्राप्त होणें अशक्य नाही.

जुन्नर परिसर-गतवैभव :

गड शिवनेरी व गांव जुन्नर यांचा इतिहास संलग्न आहे. गावाचे नांव कसें व केव्हापासून वापरांत आले याबद्दल निश्चित माहिती उपलब्ध नाही. मात्र सध्याच्या पुणे जिल्ह्याच्या शहरांपैकी जुन्नर हे असें एकच शहर आहे कीं ज्याला जास्त काळ शासकीय स्थैर्य सातत्याने लाभलें. पेशवाईतील काही काळ सोडल्यास जुन्नरचे महत्व इ.स. पूर्व ९० पासून टिकून आहे. इ.स.पू. पहिल्या शतकांत क्षत्रपांचा राजा नहपान याची ही राजधानी होती. त्याचा मंत्री अयमवत्सगोत्री याचा उल्लेख लेण्याद्रीतील शिलालेखांत आहे. नाणेघाट मार्गे पश्चिम किनाऱ्याकडील कल्याण, चौल, सोपारा

*जुने गॅझेटियर भाग-३, पान ८६

या बंदरांशी जुन्नर हमरस्त्याने जोडले गेले होते हे नाणेघाटातील आद्य ब्राह्मणी शिलालेख तसेच तोंडाशी असलेले जकातीचे दगडी रांजण व जुन्नरकडील मार्गावर असलेल्या विहिरी, यावरुन सिद्ध होते. शिवनेरी व आसपासच्या डोंगरातील लेणीं व शिलालेख हे काम एकट्यादुकट्याचे नव्हे तर अनेक जनसमूहांनी इ.स.पू. पहिल्या शतकापासून इ.स. नंतर नऊ शतकें खपून अपूर्ण ठेवलेला असा हा महाराष्ट्राचा अमोल ठेवा आहे. चालुक्य, राष्ट्रकूट, देवगिरीयादव, मोगल, मराठे व इंग्रज ह्यांच्या अमदानींचा उद्‌गम, विकास व ऱ्हास या गावाने व परिसराने पाहिलेला आहे.

जुन्नर नाव कसे पडले :

जुन्नर म्हणजे जुने नगर. जुण्ण हे जीर्णचे प्राकृत रुप. जवळच मीना नदी आहे व तिच्या खोऱ्यास मीन्नरे म्हणत. शक जातीस मीन असेंहि नांव होते. तेंव्हा मीन-नगर-मीन्नेर नावाची वस्ती आसपास असावी असे श्री. स.आ. जोगळेकरांचे मत आहे. टॉलमी ज्याला तगर म्हणतो ते त्रिगिरीवरुन झालेले असल्यास या परिसरात लेण्याद्रि, मानमोड (मानमुकूट) व शिवनेरी असे तीन गिरी आहेतच. ओमेनगर व यावननगर यावरुनही जुन्नर हें नाव पडलें असावे. नांव कसे कां पडलें असेना, बौद्धकाळातील लेणीं व शिलालेख, यादवांच्या काळातील गंगा यमुना टाकी, गजाननाची मूर्ति, पायऱ्या व हेमाडपंती कुकडेश्वर देवालय, मोगल काळातील इदगे, दर्गे, घुमट व शिलालेख, मराठ्यांच्या काळातील देवळें व मूर्ति आणि इंग्रज अमदानीतील किल्ल्यांवरची चिनी कैद्यांनी लावलेली सागाचीं झाडे, ही सर्व या परिसराची शान कशी कमी-अधिक होत गेली ह्याची साक्ष देत उभीं आहेत. सन १९५०-५१ सालीं पुराणवस्तु संशोधन खात्याने (पश्चिम भाग) भीमाशंकर लेणींत केलेल्या संशोधनात (खो.नं.६) व डेक्कन कॉलेजने जुन्नरच्या उत्तरेस गोळेगांवी केलेल्या उत्खननात सहा जुन्या वस्त्यांचे अवशेष सापडले आहेत. *"Junnar stood on a stony island, no human hands had built it, God made the town." असें एके ठिकाणी म्हटले आहे, तेच एकूण खरे.

*जुने गॅझेटियर भाग-२, पान २१८ व पान १४३ **जुने गॅझेटियर खंड-३, पान १४२

जुन्नर शहर व त्याचे ऐतिहासिक वैभव -

जुन्या काळीं जुन्नरचे आंतील व बाहेरील असे दोन भाग होते. ** बाहेरील भागांत शुक्रवार, सय्यदपुरा पेठ, पणसुंबा, माईचा मोहोल्ला, सिपाही मोहोल्ला, कोथूरपुरा, मनसुरपुरा, मंडई, कल्याण पेठ, माळवाडा, फकीरपुरा, खलीलपुरा, खालचा माळीवाडा असे १३ पुरे होते. तर आतील भागांत चांभार आळी, कुंभार आळी, खाटिक आळी, ढोरवाडा, महारवाडा, कासार आळी, पिलुचा मोहोला, सदरबझार, चंदीपुरा, सय्यदवाडा, ओव्हन बाजार, वरली आळी, शंकरपुरा, मुरलीधर आळी, महाजन आळी, सराई, आदितवार, बुधवार, कागदीवाडा, कादरपुरा, मंगळवार व अमरावती अगर अमरापूर असे २१ पुरे होते व ते हत्ती, पनसुंभा, लालवेस, फाटक, ओव्हनबाजार, आदितवार, कथवार, फकीरपुरा, ओतूर, दिल्ली, आगर, नागझरी अशा एकूण १२ वेशींच्या आत असत. दक्षिणेच्या बाजूस सिपाही मोहल्ल्याच्या मागें लाल दरवाज्याच्या बाहेर दोन तळीं असून त्यांत नावेतून जलविहार करण्याची सोय होती. उपरिनिर्दिष्ट पेठांतील कित्येक अलिकडच्या ब्रिटिश अमदानातील आहेत. मोगलांच्या काळात काहिंना निराळीच नावे असावीत. हल्लीच्या सराई पेठेस पूर्वी अझिझाबादपुरा अशी संज्ञा सन १८४२ च्या एका कागदपत्रांत नमूद आहे. मातीच्या खापरी नळीतून पश्चिमेकडील तीन विहिरींतून शहरास जिवंत पाण्याचा कायम पुरवठा होत असे. शहरातील प्रत्येकी १२ x ८ अशा १८ हौदांपैकी १२ हौदांस दक्षिणेकडील बारा बावडींच्या विहिरींचे पाणी मिळे व शिवनेरीच्या पायथ्याशीं असलेल्या दोन विहिरींतून ६ हौदांस पाणी मिळे. आत त्या एकमेकीस जोडलेल्या होत्या. मार्च-मे महिन्यांत खापरी नळीच्या खाली पाण्याची पातळी जाई तेव्हा पर्शियन चाकाच्या पद्धतीने पाणी वर खेचले जाई. या तीन विहिरींत कोठून व कसे इतके पाणी आत येते हे एक आश्चर्य आहे. *भोवतालच्या पुऱ्यांस पाणीपुरवठा करणारी हेमाडपंथी विहीर लाल वेशांबाहेर सुमारे एक हजार फुटांवर ''कुंदलवाडी'' (Round well) विहीर व गावाच्या ईशान्येस सुमारें दोन फर्लांगावर ''कावळ्याची'' विहीर त्या त्या भागांस पाणीपुरवठा करीत असत. त्याशिवाय पूर्वेस ''हापूस बागेस'' खापरी नळांनी पाणीपुरवठा होत असे तो निराळाच. आजही सिपाही मोहल्ल्यातून

*जुने गॅझेटियर पान १४६

स्वच्छ पाण्याचा प्रवाह वर्षातून चार महिने सतत चालू असतो. पाण्याचा निचरा होण्याच्या दृष्टीने जुन्नर शहराची रचना अशी विशिष्ट आहे की, पाऊस कितीही पडो, तसा अर्ध्या तासांत सर्व पाण्याचा निचरा होऊन जातो.

जुना कोट :

शहराच्या दक्षिणेस जुना कोट नावाचा एक वाडा आहे. मोगली अमलांतील हा वाडा पूर्व-पश्चिम २२० यार्ड व दक्षिणोत्तर ३०० यार्ड क्षेत्राचा ऐसपैस आहे. आज पूर्वीच्या इमारतीच्या पायाव्यतिरिक्त तेथें काहींच अवशेष शिल्लक नाहीत. भोवताली १६ ते २० फूट उंचीच्या तटांत चार कोपऱ्यांस चार, उत्तर-पूर्व बाजूस प्रत्येकी तीन, दक्षिण-पश्चिमेस प्रत्येकी दोन असे एकूण १४ बुरूज होते. आज त्यांत मामलेदार, मुनसफ, फॉरेस्ट यांच्या कचेऱ्या आहेत. दुसऱ्या बाजीरावास व चिमणाजी आप्पास इ.स. १७८४ ते १७९५ पर्यंत नाना फडणविसाने या गाढीत कैदेत ठेवले होते. इ.स. १७९५ ते सवाई माधवराव कैलासवासी झाल्यावर परशुराम भाऊ पटवर्धन *हे जुन्नरास आले व दंतकथा अशी कीं, हातांत गाईचे शेपूट धरुन ''आपणांस पेशवाईचा अधिकार मिळाला आहे'' अशी त्यांनी दुसरे बाजीरावांपाशी शपथ वाहिली. नंतर बाजीरावसाहेब त्यांच्याबरोबर पुण्यास येऊन पेशवे पदावर आरूढ झाले.

वरील जुन्या कोटाशिवाय खुद्द गावात मुसलमानी व मराठा राज्यकर्त्यांच्या अनेक वास्तूंचे अवशेष तग धरुन आहेत. १६२३-२४ मध्ये मलिकंबराने बांधलेल्या दगडघडीच्या मुख्य दरवाजाशिवाय काहीच अवशेष शिल्लक नाहीत.

आज ह्या ठिकाणी सरकारी दवाखाना व कॉटेज हॉस्पिटल आहे. जवळच सध्याची म्युनिसिपालिटीची इमारत जुन्या ''बावन चावडीच्या'' चबुतऱ्यावर उभी आहे. इ.स. १६७३-७४ चा शिलालेख अजुनहि त्या इमारतीवर आहे. गावाच्या मध्यास जुम्मा मशीद ही अलिकडची पण उत्कृष्ट अशी इमारत आहे. हिंदूंच्या देवळांपैकी रविवारातील गणपतीचें देवालय १८२० मधील तर पंचलिंग १८०० मधील आहे. *याशिवाय उत्तरेश्वर, पाताळेश्वर व ठाकुरद्वार ही देवस्थानें आहेत. जैनांची बुधवारातील व पणसुंब्यातील मंदिरे प्रेक्षणीय आहेत. याव्यतिरीक्त व

*जुने गॅझेटियर पान २३१. महाराष्ट्र देशांतील किल्ले - चिं.ग. गोगटे, १८९६

यांच्यापेक्षा सरस अशी सौदागर किंवा हबशी घुमट नावाची अप्रतिम अशी वास्तु जुन्नरच्या पूर्वेस सुमारे एक मैलावर आहे. ५२ फूट लांब ५२ फूट रुंद व ३० फूट उंचीच्या भिंतीवर २५ फुटांचा घुमट असलेल्या या इमारतीचे दक्षिणेस व पूर्वेस दरवाजे व दक्षिण दरवाज्यावरील ६ ओळींचा अरबी लेख आणि नक्षीकाम प्रेक्षणीय आहे. आत ६ पुरुष, २ स्त्रिया व १ चाकर यांची ९ थडगी आहेत. कलाकुसरीच्या दृष्टीकोनातून पाहिल्यास जुन्नरचे ते एक भूषण आहे.

जुन्नरची व्यापारी पेठ :

*''एक जुन्नरी तर हजार हुन्नरी'' अशी एक म्हण आहे. येथे बारा बलुतेदारांच्या पेठा एकेकाळी गजबजलेल्या असत. जुन्नरी कागद महाचिवट, महत्वाच्या लेखनासाठी परवापरवापर्यंत त्याचा वापर असे. पाऊणशें वर्षापूर्वी ''कागदींची'' सुमारे १०० घरें चंदीपुरा, कादरपुरा व खलीलपुरा ह्या पेठांत असून त्या घराघरांतून हा धंदा मुसलमानी अंमलापासून वंशपरंपरेने चाले. साळ्यांची ६०, कोष्ट्यांची ४०, धनगरांची ३५ घरे, लुगडी, पागोटी व घोंगड्या विणण्याचा धंदा बुधवार व शुक्रवार पेठांतून करीत असत. कातडी बुधल्यांतून तेलाचा व्यापार ब्राह्मण-बुधवारांतून चाले. ज्या कुटीरोद्योगाची आपण आज महती गातो, त्यांचे जुन्नर म्हणजे एक मोहोळच असे. कागद, तांदूळ, लुगडी, बटाटे, केळी, कांदे, मिरची, हिरडा, गहू, हरबरे, तूर, घोंगड्या, मेंढ्या, गुरें अशी बहुविध प्रकारे कल्याणमार्फत व्यापार चाले. आजहि नगर बाजूने दर बुधवारी मेंढ्यांचे कळप जुन्नरहून नाणेघाट मार्गे जात असतात. आमडेकर, महाजन, वैद्य अशा १५० घराण्यांची सावकारी मावळांत व खाली कोकणातही चाले.

जुन्नर परिसरांचे सांस्कृतिक महत्व-कोरीव लेणी व शिलालेख

गड शिवनेरी :

गड शिवनेरी जुन्नरच्या पश्चिमेस सुमारे अर्ध्या मैलावर, समुद्रसपाटीपासून ३३४२ फूट व गावापासून १००० फूट उंचीवर एक मैल लांबीचा, त्रिकोणी परंतु

*जुने गॅझेटियर भाग-३, पान १४५

कोणत्याही बाजूनें विशेषतः पूर्वेकडून पाहिल्यास एखाद्या नावेसारखा हुबेहूब दिसतो. शिवनेरी हे नांव अलिकडचे म्हणजे गेल्या तीन चार शतकांतीलच. शिवाबाईमुळें जसें शिवाजी, तसेच शिवनेरी हेही नाव पडले असावे. पूर्वी किल्ल्यांना गावांवरुनच नांवे देत. त्या काळी ज्याच्या हाती किल्ला त्याच्या हाती परिसराची सत्ता. त्यामुळें किल्ल्यांना विशेष महत्व असे. शिवनेरी तर घाटमाथ्यावरील मैदानी मुलखाच्या तोंडी, त्यामुळे तर अनन्यसाधारण महत्व.

स्थान :

तसा शिवनेरी एकाकी नाही. पश्चिमेस नाणेघाटाच्या तोंडाशी दक्षिण बाजूस जीवधन व चावंड, उत्तरेस हरिश्चंद्र गड व हडसर, तर पूर्वेकडे नारायणगड अशा पाच भावंडासमवेत हा उभा आहे. जीवधनच्या पश्चिम टोकावरील माकडटेकडी, हडसरवरील ६५ यार्ड *लांबीचा खडकांतील जिना, तसेच हरिश्चंद्र गडावरील महादेवाची पाण्यातील एक पुरुष उंचीची भव्य पिंडी व देवळाच्या छतावरील नक्षीकाम आणि पश्चिम टोकावरील वर्तुळाकृती इंद्रधनूचा मे मधील विशिष्ट नैसर्गिक चमत्कार वाखाणण्यासारखी आहेत. शिवाय सभोवताली तुळजा, मानमोड, दुधारे लेण्याद्रि (सुलेमान), नवरानवरी, हटकेश्वर हे डोंगर आहेतच. वरीलपैकी तुळजा, अंबाअंबिका (मानमोड) व लेण्याद्रि ही देवस्थाने सोडल्यास शिवनेरीशिवाय इतर गडांवर जाण्यास एकाकी मानव धजत नाही. शिवनेरीचें तसें नाही. हा किल्ला माणसाळलेला आहे. स्त्रिया व शाळकरी मुलें सहजगत्या गडावर तीनएक तासांत जाऊन गावांत परत येऊं शकतात.

इतिहास :

सांस्कृतिक, ऐतिहासिक व सामाजिक दृष्ट्या शिवनेरी व त्यांच्या परिसराचे महत्व इ.स.पू. पहिल्या शतकापासून सातत्याने टिकलें आहे. या किल्ल्यावर पाच निरनिराळ्या राज्यकर्त्यांच्या खुणा अद्यापि अवशेष म्हणून आढळतात. सध्याची तटबंदी, कमानी, दरवाजे व इतर बहुतेक वास्तू या मोगल अमदानीतील परंतु त्यापूर्वीचे गडांचे वैभव आगळेच होते. सुरवातीस बौद्धधर्मीयांकडे व बौद्धधर्मीयांच्या नंतर या गडाचे स्वामित्व देवगिरीच्या यादवांकडे (११७०-१३१८) गेलें, हे गडावरील गंगा-

* जुने गॅझेटियर अहमदनगर जिल्हा, पान ७१७

यमुना टाक़ीं, कमान टाक्याच्या पायऱ्यांची विशिष्ट घडण, पूर्व बाजूस किल्ल्यावर जाण्याच्या पायऱ्यांच्या तोंडाशी (ब्रिटिशांनी १८१८च्या मे मध्ये त्या उडवून दिल्या) असलेली गणपतीची मूर्ति, यांवरुन समजून येतें. त्यानंतरचा काळ मुसलमानी अमलाचा. १४४३ मध्ये मलिक उल तुजार बहामनी सरदाराने गांव किंवा किल्ला कोळी लोकांच्या ताब्यातून घेतला. १४८५ मध्ये अहमदनगरच्या निजामशाहीचा स्थापनकर्ता * मलिक अहंमद हा मलिक-उल-तुजारचा प्रतिनिधी म्हणून जुन्नरास आला. किल्लेदार किल्ला ताब्यात देईना. तेव्हा यानें वेढा घालून रसद तोडिली व किल्ला सर करुन आत असलेला पाच वर्षांचा या भागातील वसूल घेवून त्या पैशात फौजफाटा उभा करुन मुलूख ताब्यात ठेवला. पण पुढील वर्षी मलिक-उल-तुजारचा खून झाला. त्यावेळी मलिक जंजिरा प्रांतात राजापुरी येथें होता. तो लगेच जुन्नररास आला व निजाम-उल्-मुलूक बहरी किताब घेऊन राजा झाला. पुढील जवळ जवळ एक शतक निजामशाहीच्या अमलाखाली हा किल्ला असे. परंतु पुढें इ.स. १५९५ मध्यें दुसरा बहादुरशहा निजाम याने शिवाजीचा आजा मालोजी भोसले यास पुणे-सुपे हे दोन प्रांत व शिवनेरी व चाकण हे दोन किल्ले व त्यांच्या आसपासचा मुलुख जहागीर दिला. विजापूरच्या आदिलशाहीस हा एक शह होता. त्या काळी सत्तेचा समतोलपणा राखण्यासाठी अगर आपलें अस्तित्व टिकविण्यासाठी असे जहागिरदार एकदां निजामशाहीशीं तर दुसऱ्या खेपेस आदिलशाहीशी संधान बांधीत व प्रसंगी आपली जहागीर वाढवीत. शहाजीचा तोच हेतु होता. परंतु ह्या स्पर्धेत शहाजी व त्याचे सासरे लखुजी जाधव हे विरुद्ध बाजूंस खेचले गेले व दोघांत वितुष्ट आले. नवरा व बाप ह्यांच्या भांडणांस जिजाबाई नवऱ्याबरोबरच फिरे. माहुली किल्ल्यावरुन शहाजी विजापुराकडे जात असताना दिवस भरत आल्यामुळें म्हणा अगर शिवाजीचा थोरला भाऊ संभाजी याचे लग्न शिवनेरीच्या विजयराज नावाच्या सरदाराच्या जयंती नावाच्या मुलीशीं ठरलेल्या लग्नासाठी म्हणा, त्यानें नाईलाजानें जिजाबाईस गडावर ठेवले व लग्नानंतर ती तेथेच राहीली. अशा रितीने केवळ योगायोगाने फाल्गुन वद्य ३ शके १५५१ शुक्रवार दि. १९ फेब्रुवारी सन १६३० ला सुर्यास्तानंतर शिवरायांचा जन्म झाला. **

*जुने गॅझेटियर खंड-३, पान २२५ **शिवभारत-परमानंद, पान ८८

परंतु हा किल्ला फार काळ शहाजीकडे राहिला नाही. विजापूरकरांनी शहाजीस नोकरीस बोलाविले. शहाजीने ते नाकारले. तेव्हा विजापूरचा बादशहा महंमद व मोगलांचा सरदार रणदुल्लाखान यांनी शहाजीस जिंकण्याचा प्रयत्न केला. तेव्हा शहाजीने नाईलाजाने होकार दिला व किल्ला स्वाधीन केला. हे १६३७ साल असावे. १६५० मध्ये शिवाजी महाराज वीस वर्षांचे असताना स्वराज्याचे विचार त्यांच्या मनात घर करु लागले. त्या वर्षी त्यांच्या प्रोत्साहनाने भागांतील कोळी लोकांनी बंड केले. याची मोगल बादशहास चीड आली. त्याने ते बंड तर मोडलेच पण अनेक कोळी लोकांना पकडून त्यांची मुंडकी उडवून त्यावर एक चबुतरा बांधला. त्याला ''काळा चबुतरा''* म्हणत. तो अजूनही आहे असे नव्या गॅझेटियरमध्ये सुद्धा आहे. परंतु प्रत्यक्षात तो कोठे आढळत नाही. शिवाजी महाराजांचा हा पहिला प्रयत्न. नंतर पुन्हा १६५६ मध्ये महाराजांनी हा गाव लुटला. त्यात ११ हजार होन, २२० घोडे व मौल्यवान वस्त्रे मिळवली. १६५७ च्या मेमध्ये पुन्हा रातोरात गाव लुटून त्यांनी ३ लाख होन मिळविले. १६७० व १६७५ मध्ये पूर्वीपेक्षाही जास्त जोरदार असे प्रयत्न झाले. त्यावेळ अब्दुल अझीझखान नावाचा बाटगा मुसलमान किल्लेदार होता. शिवाजीनें हल्ला केला तेव्हां लवाजमा किल्ल्यावर नव्हता. इतकेच काय पण सैन्यहि नव्हते. ** शिवाजीने अझीझखानास ''सोन्याची रास'' देण्याचे कबूल करुन किल्ला ताब्यात देण्याचे ठरले. खान कबूल झाला व ठरलेल्या दिवशी ७ हजार घोडेस्वारांसह ताबा घेण्यास यावयाचे ठरले. परंतु गुप्तपणें खानाने बहादुरखानास कटाबद्दल सूचना केली व मराठ्यांचे सैन्य पेचात सापडून त्याचा धुव्वा उडाला. पूर्व बाजूच्या पायऱ्यांनी शिवाजीचे दोन लोक वर गेले पण त्यांच्यावर वरुन दगडांचा मारा झाला व शिवाजीच्या लोकांची दाणादाण झाली. ''जोपर्यंत या किल्ल्याचा मी किल्लेदार आहे तोपर्यंत तुझ्या हाती हा किल्ला कधीच येणार नाही.'' असे खानाने शिवाजीस बजावले म्हणतात. पुढे १७१६ च्या स्वराज्याच्या सनदेनें शाहू महाराजांना मोगलांपासून हा किल्ला मिळाला. १७६२ मध्ये मोगलांच्या सैन्याने पेशव्यांचा पुणे-नगर मार्गावर पराभव केल्यामुळे राघोबादादानें हा किल्ला मोगलांस दिला. ***२१ मे १८१८ ला मेजर एल्ड्रिच बाजीरावाचा पाठलाग करीत जुन्नरला आला. त्यावेळी आण्णा रत्तीकर हा

*जुने गॅझेटियर खंड-३, पान २२६, नवे गॅझेटियर पान-५०, जुने गॅझेटियर पा.२२७, शिवाजी यदुनाथ सरकार

** यदुनाथ सरकार - Shivaji and His times, Pg. 198 *** जुने गॅझेटियर पान २३१

शिवनेरीचा किल्लेदार होता. त्याला एल्ड्रिचचा सुगावा अगोदरच लागला होता. त्यानें अगोदरच हडसर किल्यावर पलायन केले. त्यामुळे इंग्लिशांच्या हाती हा किल्ला अविरोध आला.

१८४१ च्या सुमारास चिनी कैद्यांस या किल्ल्यात ठेवले होते. त्या वेळचा जंगल खात्याचा पहिला अधिकारी डॉ. गिप्सन ह्याने या कैद्यांकडून सागाची झाडें लावली व भाजीपाला व बाग तयार करविली. *१८४५ मध्ये राघोजी भांगरे यानें बंड केलें असता, ब्रिटिशांनी आपली एक तुकडी या किल्ल्यात आणून ठेवली होती. अशी ही किल्ल्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी.

गडावर जाण्यास मार्ग :

शिवनेरीवर जाण्यास परदेशपुऱ्यातून जुना व नुकताच तयार केलेला पी.डब्ल्यू.डी.च्या डाक बंगल्यावरुन नवा, असे दोन मार्ग आहेत. जाताना डाव्या बाजूस ''भातखळें'' नावाचे ओसाड गांव लागते. तेथे गेल्या शतकाअखेर वस्ती होती असें कागदपत्रांतून आजहि आढळते. तसेच पुढे गेल्यावर ''पीरपाडी'' खिंडीतून गडाकडे जाताना डाव्या बाजूस ''जुनें भातखळें'' असे किल्ल्यावर जेव्हां वस्ती होती तेव्हां तेथे बाजार भरत असे. पुढे तसेच गेल्यावर पहिला रसून, दुसरा गणेश अगर परवानगी, तिसरा हत्ती, चवथा चांगल्या घडणीचा पीर (जवळचें पीराचे थडगे) व पाचवा सागवाणी लाकडाचा शिवाबाई असे पांच दरवाजे लागतात. त्यातून उजव्या बाजूस गेल्यावर बैठ्या देवडींतून शिवाबाईकडे आपण जातो. पुन्हा परत येऊन डाव्या अंगास चढण चढून गेल्यावर सहावा फाटक व सातवा कुलापकर असे दोन दरवाजे लागतात. त्यापुढे बालेकिल्ला व डाव्या अंगास पायवाटेने गेल्यावर प्रथम गंगा–यमुना टाकी व उजव्या बाजूस कमान टाके व समोर कंपौन्डच्या आंत शिवजन्म स्थान लागते. त्याहिपुढे बदामी तळे व थेट उत्तरेस कडे लोटाचा बुरूज लागतो. बाले किल्ल्याच्या दक्षिणेस बौद्ध लेणी व अंबारखाना व बालेकिल्ल्यावर इतगा व घुमट लागतो.

शिवजन्मस्थान :

सध्याची शिवजन्मस्थानाची इमारत नवी, पूर्वी अगदी जुनाट, पडकी, निवडुंगांनी आच्छादलेली अशी एकच इमारत उभी होती. **शिंदे सरकारनें

 * जुने गॅझेटियर पान–२३१ ** ह.आ. सहस्त्रबुद्धे–शिवजन्म आणि शिवनेरी किल्ला, १९२७

शिवजन्मस्थानाची जागा निश्चित करण्यासाठी एक हजार रुपये दिले. जागा मुक्रर झाली, फंड जमा झाला, पण पुराण वस्तु संशोधन खात्याने त्यांना इमारत बांधण्यास नकार दिला. ''जनतेने पैसा व सल्ला द्यावा, खाते इमारत बांधील'' असे सांगितले गेले. वास्तविक वाड्याच्या चबुतऱ्याची व न्हाणी घराची योजना पाहता सध्याची खोली जिजाबाईसारख्या सरदार कन्येसाठी प्रसूतिगृह म्हणून होणार नाही, मूळ वाड्यातच वास्तव्य राहणार असे श्री. म.म.द.वा. पोतदार यांच्यासारख्या इतिहासतज्ञांचे मत, परंतु येवढीच वास्तू उभी राहून या इमारतीचा जीर्णोद्धार झाला. जवळच वाड्याचा चबुतला, न्हाणीघर व अष्टकोनी हौद व कारंजी आहेत. त्यावरुन वाड्यात पाणी कसें खेळविले होते ते दृष्टोत्पत्तीस येते.

शिवाबाईचे देऊळ :

दुसरी महत्वाची इमारत शिवाबाई देवालयाची. पूर्वीच्या बौद्ध लेणीत अंबाअंबिका किंवा लेण्याद्रिप्रमाणेंच शिवाबाईची चतुर्भुज मूर्ति व तांदळा अगदी नवीन आहे. जुनी मूर्ति व तांदळा २२ डिसेंबर १९४५ रोजी कोण्या माथेफिरुने छिन्नविछिन्न केली. पुढे २७ फेब्रुवारी १९४८ रोजी सध्याची मुर्ती व तांदळ्याची स्थापना झाली. मंडपाच्या मध्यभागी कारंजे होते ते आता बुजविले आहे. सध्या देवीच्या पूजेसाठी सरकारातून ४ रु. शाहुसातारकरांकडून रु. ४० तेलवातीसाठी, पुजाऱ्यास कुसुरच्या लोकांकडून ५/४ मण धान्य व फॉरेस्ट खात्याने ४ जनावरें चारण्याची परवानगी अशी सध्याची वास्तुची व्यवस्था आहे. १९६० साली शिवस्मारक समितीनें मंडप व देऊळ ह्यांचा जीर्णोद्धार महाराष्ट्र राज्यस्थापनेच्या वेळी केलेला आहे.

कमान टाके :

तिसरी वास्तू कमान टाकें किंवा मशीद. या टाक्याचे आतील व बाहेरील दोन भाग आहेत. उतरण्यास देवगिरी यादवांच्या वेळच्या पायऱ्या आहेत. टाक्यांवर १५ फूट उंच व २४ फूट लांब असलेली कमान जुन्नरच्या परिसरातून कोठूनही दिसते. कमानीच्या भिंतीवर उजव्याबाजूस झिजून गेलेले दोन शिलालेख आहेत. त्यातील एकात ''मूर्तजा निजाम शहाचा मुलगा बुऱ्हा निजामशहाच्या कारकीर्दीत १६२५ मध्ये ही मशीद बांधली'' असा उल्लेख आहे.

गंगा-यमुना टाकी :

चौथी वास्तू गंगा-यमुना टाकी देवगिरी यादवकालीन आहेत. गडावरील स्फटिकशुद्ध थंडगार पाणी येवढेंच. गड चढून वर गेल्यावर आलेला थकवा या पाण्यानें पूर्ण निघून जातो.

बदामी टाके :

थेट उत्तरेस दुसरें विस्तीर्ण असे बदामी टाके ३३ पावले लांब रुंद व ८ फूट खोल बदामाच्या आकारासारखे भव्य आहे. किल्ल्याच्या या भागातील सांडपाणी खापरी नळांतून आत येण्याची व्यवस्था केलेली होती. त्याचे अवशेष आजहि दिसतात. सांजसकाळी शांत विश्रांतीस्थान म्हणून याचा उपयोग होत असे.

कडेलोट बुरूज :

अगदी टोकास कडेलोटाचा बुरुज १७६० पर्यंत उपयोगांत आणला जात असे. त्या सालात पेशव्यांच्या जुन्नरच्या रामजी * सावंत या अधिकाऱ्याने जावजी नावाच्या कोळी बंडखोरांच्या टोळीतील ७ कोळी पकडून त्यांचा या बुरुजावरुन कडेलोट केला.

घुमट :

खुद्द बालेकिल्ल्यावर एक इदगा व एक घुमट आहे. घुमटावर कुराणांतील व अरबी भाषेंतील वचने कोरलेली आहेत. आत स्त्रीचे **थडगे आहे. ते बहुधा दौलतखानाची आई दौलतबिबी हिचे असावे. याव्यतिरिक्त किल्ल्याच्या पूर्व बाजूस कमान टाक्याखालील कड्यांतून किल्ल्यावर जाण्यास पायऱ्या पूर्वी होत्या. परंतु १८१८ च्या मे महिन्यात मेजर एल्ड्रिचच्या सैन्याने त्या उडवून दिल्या. त्या पायऱ्यांच्या उजव्या अंगास खडकांत गणपतीची कोरीव मूर्ति आहे.

लेणी व शिलालेख : ***

जुन्नरच्या परिसरात असणारी लेणी जुन्नरच्या प्राचीनत्वाची साक्ष देतात. दोनतीन मैलांच्या परिसरात मानमोड, शिवनेरी, तुळजा व गणेश असे चार गट असून, नाणें घाटातील पाचवा गट सुमारे १८/२० मैल दूर आहे. जुन्नरच्या लेणींची एकूण

*जुने गॅझेटियर, भाग-२, पान-१६० **By Ways of Bombay-S.M. Edwards, Pg.-34
***सह्याद्रि - स.आ. जोगळेकर, पान १७३

१३५-१४० संख्या असून तीमध्ये ३५ शिलालेख आहेत. ही सर्व बौद्ध काळातील असून इ.स. पहिल्या ते चौथ्या शतकात ती कोरली गेली असावीत. नाणेघाटांतील लेणीचा व शिलालेखांचा काळ मात्र इ.स.पूर्व पहिले शतक मानतात.

नाणेघाटातील लेणीं ऐहिक, मानमोड व इतर डोंगरांतील धार्मिक लेणी असून त्यामध्ये बौद्ध, जैन व ब्राह्मणी या तीनहि धर्माची लेणी आहेत. मूळची बौद्ध व त्यावर वरील तीन धर्मीयांचे संस्कार झाले. मानमोड डोंगरातील अंबाअंबिका लेणीत जैन मुर्ति असून गणेश लेणींत अष्टविनायक आहे. शिवनेरीवर एका लेणींत शिवाबाई असून, तुळजाबाई तुळजा डोंगरातील एका लेणींत आहे व शिवनेरीच्या पूर्व बाजूस वरच्या भागांतील क्र.२२ मधील लेणींत दरवाजाचें नक्षीकाम ब्राह्मणी आहे. सह्याद्रीतील सर्वच लेणींच्या भिंतीवर व खांबावर तुसांचा गिलावा चढविलेला होता व त्यावर चित्र व रेखाकृति होत्या. पुढें १८६१ च्या सुमारास *कोणी बडे पाहुणे येणार म्हणून त्या भिंती व खांब स्वच्छ केले गेले असें म्हणतात. कदाचित दोन हजार वर्षांच्या कालावधीत हळूहळू नाहींसा होत जाणेंहि शक्य आहे. तरी पण अजूनही जुन्नरच्या परिसरातील चारहि गटांत एखाद्या-दुसऱ्या लेणीत रेखाकृतींचे अवशेष पाहावयास सापडतात. भूतलिंग गटांतील उजव्या बाजूचा स्तूप हा सर्वात प्राचीन आहे. तुळजा गटांतील डावीकडून क्रमांक २ हे लेणें वर्तुळाकार असून अद्वितीय आहे. गणेश लेणींतील अष्टविनायक असलेले लेणें हे येथील गटांतील सर्वात विस्तीर्ण आहे. सह्याद्रीत लेणी खोदण्यात येऊ लागली तेव्हापासून तो ही प्रथा लुप्त झाली तोवर येथे शिल्पकार्य सुरु होते असे त्याच्या घडणीवरुन अनुमान निघते.

या १६५/१४० लेण्यांपैकी जुन्नरच्या दक्षिणेस मैल दोन मैल मानमोड (मूळ नांव मानमुकुट) डोंगरात पूर्वेस भिमाशंकर (मूळ नांव गिधविहार) उत्तरेस जुन्नर बाजूस अंबिका व शिवनेरीच्या दिशेस भूतलिंग असा एक गट असून त्यामध्ये ५० लेणीं आहेत. या ५० पैकी ४ चैत्यगृह असून ४६ वसतिगृहे आहेत.

दुसरा गट शिवनेरी किल्ल्याच्या पश्चिम, पूर्व व दक्षिण कुशीत, ही एकूण ६५ असून त्यापैकी ३ चैत्यगृहे आहेत.

तिसरा गट तुळजा लेणींचा, शिवनेरीच्या पश्चिमेकडील. यामध्ये एकूण ११ पैकी १ चैत्यगृह आहे.

*सह्याद्रि - स.आ. जोगळेकर

चौथ्या जुन्नरच्या उत्तरेस सुलेमान किंवा गणेश गटांत २६ लेणी असून त्यापैकी २ चैत्यगृहें आहेत. काहीं लेण्यांत खुंट्या ठोकण्यासाठी भोंके पाडली असून, जमिनीस उखळे आढळतात. दरवाजास लाकडी चौकट बसविण्यास खाचाही केलेल्या आढळतात.

या चारही गटांत पाण्याची विपुल टाकीं असून त्यातील काहींच्या थंडगार पाण्यानें तृषार्ताची तहान व थकवा नाहीसां होतो. शिवनेरीवरील गंगा-यमुना टाकीं सिंहगडावरील पाण्याची आठवण करुन देतात. अंबा अंबिकेच्या डोक्यावर पंचविव्हरांत बर्फाइतके थंडगार पाणी सदैव असते. गणेश लेणींत देवालयांच्या देवडींत २० फूट खोल शेंदून पाणी काढावें लागते. तेहीं थंडगार व तितकेच स्वच्छ. वास्तविक सर्व टाक्यांत तांब्याचा जुना पैसा टाकल्यास अधेली पडल्याचा आभास होतो. तळाची सुई टिपून घ्यावी इतके स्वच्छ पाणी असतें. वास नाही कीं रोग नाही.

मुसलमानी काळांतील व बौद्ध काळातील शिलालेखांतील महत्वाचा फरक म्हणजे मुसलमानी काळांतील लेख उठावाचे असून, बौद्ध काळांतील लेख पृष्ठभागांत खाचून केलेले आहेत. उठावाचे असूनसुद्धा मुसलमानी लेखांतील अक्षरें सुबक व वळणदार आहेत. हे अरबी व पार्शीयन भाषेत असून त्यापैकी ४-५ ऐतिहासिक महत्वाचे आहेत.

जुन्नरपासून एक मैलावर मानमोड डोंगरातील पूर्वेकडील भिमाशंकर गटास अंबिका गटाकडून किंवा पूर्वेकडूनही जाता येते. लेणी क्र.१ साधें आहे. सुमारें २०० फूट चढून गेल्यावर डावीकडून लेणींस सुरुवात होते. क्र.२ मध्ये दागोबा कोरण्याचा प्रयत्न केला पण खडकाच्या ठिसूळपणामुळे काम पूर्ण केले गेले नाही. त्याच अर्धवट दागोबाची ओबडधोबड त्रिमूर्ति करण्यात आली. या लेणीत पूर्वी रेखाचित्रे असून त्यांचे अवशेष व्हरांड्याच्या छतास आजही दिसतात. तांबड्या, पिवळ्या व पांढऱ्या रंगात, चौकोनांत वर्तुळे बसविलेली आहेत. क्र.७ च्या लेणींतील अपमवत्सगोत्रीचा शिलालेख इ.स. १४६ मधील आहे हे त्यातील तारखेवरुन समजते.

*अंबिका गटांत अंबाअंबिकेचे दैवत क्र. ३० (डावीकडून) मध्ये आहे. डाव्या बाजूने चढून ३०/४० फूट या लेण्यांचे डोक्यावर गेल्यास पिण्याचे थंडगार पाण्याची ७ टाकी आढळतात. त्यापैकी २ मध्ये सतत पाणी असतें. उपरिनिर्दिष्ट

*जुने गॅझेटियर, खंड-३, पान १७०

क्र.३० लेणींत जैनांच्या अंबाअंबिका मूर्ति असून दसऱ्याच्या नवरात्रांत तेथें यात्रा भरते. या देवतांवरुन या गटास ''अंबिका'' नाव पडले. हल्लीच्या पायऱ्या चढून गेल्यावर सुरुवातीस डाव्या हातास भिंतीवर १०/११ व्या शतकांतील जैन क्षेत्रपाळाची मूर्ति कोरलेली आहे. डोक्यावर वलय व डावा हात कंबरेवर, उजव्या पायाशी एक मनुष्य व डाव्या पायाशी एक कुत्रा अशी उभी मूर्ति आहे. उजव्या हाताच्या भिंतीत चक्रेश्वरी ही जैन देवता कोरली आहे. दोनही किंबहुना आंतील देवतासुद्धा कोणी धर्मांधांनी छिन्नविछिन्न केलेल्या आहेत. आत शिरल्यावर पाठीच्या (समोरच्या) भिंतीत डाव्या बाजूची जैन २२ व्या तीर्थंकर नेमीनाथची मांडी घालून डोक्यावर छत्र असलेली व चौरी व देवदूत कोरलेली मूर्ति आहे. तिच्या उजवीकडे जैन हे पहिले तीर्थंकर आदिनाथ यांची मस्तकाभोवती वलय, वर छत्र व देवदूत अशी मूर्ति उजवा पाय सोडून बसती कोरलेली आहे. डाव्या गुडघ्याखाली तिचें वाहन सिंह, दोन्ही मांड्यांवर दोन पुत्र सिद्ध व बुद्ध, डाव्या बाजूस छत्रधारी मानव व झाडावर तीन तीर्थंकर, अंबिकेपेक्षा आपले श्रेष्ठत्व दाखवितात. अंबिका ही नेमिनाथांची शासनदेवी. १०/११ व्या शतकांतील या मूर्ति कोरलेल्या आहेत.

यानंतर क्र. २६ चे लेणें महत्वाचे आहे. त्यात १०/१२ शिलालेख असून शिलालेखांसाठीच ते तयार केलेले असावे. दर्शनी भाग आधीं तयार झाला व नंतर आंत मऊ खडक लागला असावा. त्यांतील *शिलालेखांपैकी क्र. ८ च्या शिलालेखांत गिधविहार, धनगरवाडी, पानसरवाडी, वळणगांव, कुसुर (किसिरवलय) या गावांचा उल्लेख आहे. ही गांवे जुन्नरच्या आसपास आजहि आहेत. क्र. ११ च्या शिलालेखात मानमुकुड (ट) असा उल्लेख आहे. त्यावरुन मानमोडी असे नाव पडले. क्र.१२ च्या शिलालेखात हिजरी सन ९८८ (स.न. १५८०) असून, तो नंतरचा आहे. क्र. १४ मध्ये सेवरुक म्हणजे सावरगांवाचा उल्लेख आहे.

अंबिकागटाच्या पूर्वेस शिवनेरीच्या बाजूस सुमारें २०० यार्डावर या मानमोड लेण्यांपैकी ''भूतलिंग'' लेणीं आहेत. यांना अंबिकागटाच्या पुढील क्रमांक डावीकडून उजवीकडे आहेत. क्र. ४५, ४६, ४७ या लेणींच्या समोरच्या भिंतीवर क्र.१२ शिलालेखाप्रमाणेंही सन ९८८ (स.न. १५८०) असून, तो नंतरचा आहे.

**या गटांतील लेणें क्र.४० हे सर्वात जुने लेणें. व्हरांड्याच्या वर एक

*जुने गॅझेटियर खंड-३, पान १७४, Cave Temples of India, XII 50.

** जुने गॅझेटियर खंड-३, पान १८३, James Fergusson & James Burgess.

कमान कोरली असून त्यांतील खिडकीवर अर्धवर्तुळाकृती कमळ आहे. एकूण सात पाकळ्या असून त्यांतील मधल्या पाकळीत लक्ष्मी आहे. तिच्या उजव्या बाजूस कमळ व डाव्या बाजूस कमलपत्र आहे. कानांत कुंडले, डावा हात कमरेवर व उजव्या हाताने आशीर्वाद देत आहे. कडेच्या पाकळ्यांतील हत्ती कमळावर उभे राहून सोंडेत पाण्याचे कलश धरुन पाणी सिंचन करीत आहेत. हत्तीच्या एका बाजूला कमलपत्र व दुसऱ्या बाजूस कमलकलिका आहे. या हत्तीच्या शेजारील पाकळ्यांत पुरुष असून त्यांच्या एका बाजूल कलिका व दुसऱ्या बाजूला उमलतें कमळ आहे. शेवटच्या पाकळ्यांत स्त्रिया असून पुरुषांप्रमाणे नर्तनाच्या भूमिकेंत आहेत. या कमळाच्या वर नागराज व डोक्यावर पंचमुखी नाग आहे. डाव्या बाजूस गरुड आहे. बुद्धाच्या प्रभावानें या दोघांनी आपले वैर विसरले आहे. या दोघांच्या कडेस दागोबा कोरले असून त्यांचा लिगाप्रमाणे आकार म्हणून शेषलिंग म्हणतात व पुरुषाकृतीस भूत समजून (Spirits) ती या लिंगांची रक्षणकर्ती म्हणून या लेणीस ''भूतलिंग'' म्हणतात.

शिवनेरीच्या पूर्व कुशीत दोन गट आहेत. एक खालच्या थरांतील व एक वरच्या थरातील खालच्या थरांत १२ लेणी असून त्या विशेष असें काही नाही. वरच्या थरांतील क्र. ३२/१९,२३/२४ यांच्यामधून किल्ल्यावर कमान टाक्याकडे जाण्यासाठी खोदलेल्या पायऱ्या होत्या. सुरुवातीस दुर्गा, गणेश व बटुक यांच्या मूर्ति कोरल्या आहेत. मुसलमानी काळात या मूर्ति व कांही पायऱ्या छिन्नविछिन्न केल्या गेल्या. १८१८ मध्ये ब्रिटीशांच्या ताब्यात किल्ला गेल्यावर त्यांनी त्या सर्व उडवून दिल्या. पायऱ्याचे खोदकाम व मूर्ति मुसलमानांपूर्वी (१३२०) देवगिरी यादवांच्या काळात केल्या गेल्या असाव्यात. अजूनही काहीं लोक पायऱ्या चढून ह्या बाजूने वर किल्ल्यावर जाऊ शकतात. क्र.२२ च्या समोर दगडी भिंत आहे व दरवाजाचे नक्षीदार खांब ब्राह्मणी काळांतील आहे.

या लेणीच्या डाव्या बाजूस उत्तरेकडे ३०० फुटांवर १४ लेणींचा एक गट असून त्यांना ''बारागडद'' म्हणतात. यांतील लेणींत बारा खोल्या असून त्यावरुन या लेण्यास वरील नाव मिळाले आहे. यामध्ये रेखाकृति स्पष्ट दिसतात. क्रमांक ३६ लेणींतील रेखाकृति अगदी सुस्पष्ट आहेत.

पश्चिम बाजूकडील लेणीं अवघड जागी असून महत्वाचे असे त्यात काही नाही.

जुन्नरपासून दोन अडीच मैलांवर पश्चिमेस सुमारे १०० फुटांवर तुळजा लेणीं आहेत. जाताना पद्मावतीचें तळे असून खालच्या बाजूस जैनांच्या २३व्या पार्श्वनाथ तीर्थंकाराची रक्षणकर्ती पद्मावती देवीचे चौकोनी देऊळ आहे. या लेणीतील क्र.२ चे लेणें अद्वितीय आहे. यासारखी लेणी पश्चिम हिंदुस्थानात कोठेहीं नाहीत. १२ अष्टकोनी खांबांच्या वर्तुळात दागोबा आहे. क्र.३ मध्ये तुळजादेवी सिंहावर बसली आहे. पहिल्या उजव्या हातात खंजीर घेऊन तो हात कमरेवर आहे. दुसऱ्यामध्ये त्रिशूळ, तिसऱ्यांत तलवार व चौथ्यात सिंहाचे शेपूट आहे. डावीकडील पहिल्या हातात सिंहाचे डोकें, दुसऱ्यात ढाल, तिसऱ्यात धनुष्यबाण व चौथ्यात गदा आहे.

सुलेमान किंवा गणेश डोंगर जुन्नरच्या उत्तरेस एकदीड मैलावर आहेत. त्यातील क्र.६ लेणे चैत्यगृह असून कार्ल्याच्या लेणीची आठवण करुन देते. या लेणीच्या दरवाज्यावर कल्याणच्या हिरण्यकाचा मुलगा सुलासदत्त याने देणगी दिल्याचा उल्लेख आहे. त्याच्याच उजव्या बाजूस आपल्या डाव्या हातास ७व्या लेणीत जरा उंचावर अष्टविनायकाचे स्थान आहे. याला लेण्याद्रि म्हणतात.

जुन्नरच्या उत्तरेस गणेश पेठेतून कुकडी नदी पार झाल्यावर उजव्या बाजूस चढाने वर जावे लागते. जाताना वाटेत आंब्याची झाडे लागतात. ती राघोबा दादा यांचा दत्तक पुत्र अमृतराव यांनी लावली. लेण्याद्रिच्या पायऱ्या निरनिराळ्या लोकांनी गणपती आपल्याला पावला म्हणून बांधल्या, एकूण २८० पायऱ्या असून चढण्यास सोप्या आहेत. अगदी वरच्या बाजूस जुन्या खोदलेल्या पायऱ्याही दिसतात. या पायऱ्या चढून गेल्यावर स्वयंसिद्ध एका दगडाच्या बिनखांबी ५७' लांब, ५१'५'' रुंद व ११'१''अशा भव्य सभामंडपात उत्तराभिमुख अष्टविनायकाची बैठी मूर्ति आहे. मूर्तीच्या जागी पूर्वी दागोबा कोरलेला असावा व त्यालाच पुढें बुद्ध धर्माचा ऱ्हास झाल्यावर गणपतीचा आकार ब्राह्मणी लोकांनी दिला असावा, काहीं का असेना अंबाअंबिका, शिवाबाई, तुळजाबाई प्रमाणे विनायकहि आयत्या बिळात नागोबा झालेला आहे. "ही मूर्ति निदान ५०० वर्षापूर्वीची असावी. सभामंडपाभोवती एकूण ३० खोल्या असून आंतील अंगात १'१०''X १'६'' चबुतरा आहे. डाव्या खोल्यांच्या

पुढील भिंतीवर उत्तर काळांतील सतींची स्मारके कोरलेलीं होती. कोणीतरी त्यांचा नाश केलेला आहे. त्यामध्ये पतिसमवेत सती जाताना ज्वाला निघत आहेत असे दृश्य आहे. दर्शनी भागास शातकर्णी खांब व त्यावर वाघ, हत्ती यांची खोदीव चित्रें आहेत. आंत छतावर हंड्या बसविण्यासाठी खोबणी अलिकडे पाडल्या आहेत. गणपतींचे शेदुराचे कवच सुमारे १ ।। फूट जाडीचें होते. ते वेशाखशुद्ध एकादशी शके १८४६ रोजी (१९२४ इ.स.) टाकले गेले. व्हरांड्यात उजव्या डाव्या बाजूस लोखंडी गजांच्या झाकणाखाली पाण्याची जोड टाकी असून १५'१'' फुटांखाली स्वच्छ थंडगार पाणी शेंदून काढावें लागते. लेण्याद्रि हा अपभ्रंश आहे. लेणे (मराठी)+ अद्रि (संस्कृत) = लेण्यद्रि म्हणावयास पाहिजे. उच्चारास सोईस्कर म्हणून लेण्याद्रि म्हणण्याचा प्रघात पडला.

सध्या सरदार श्री. तात्यासाहेब देशपांडे हे माघ व.४ व भाद्रपद शु. ४च्या उत्सवांची व्यवस्था पाहतात. त्यांच्याकडे चिंचवड मोरया गोसावी संस्थानकडून १९०४ ते १९४१ पर्यंत १२५ रु. पूजेसाठी येत. नंतर डि. जज्ज श्री. लोकूर ह्यांच्या खटपटीने २५० रु. मिळू लागले. त्यांतून दरमहा रु. २० प्रमाणे पूजेसाठी भटजींना दिले जातात व ३०-४० रु. ते स्वतःचे उत्सवास खर्च करतात. शिवाय पंचलिंग, उत्तरेश्वर, पाताळेश्वर, लेण्याद्रि व वैजनाथ या पांच देवस्थानांसाठी सरकारकडून रु. २२५ वर्षाकाठी मिळतें. त्यातून नंदादीपासाठी व साफसफाईसाठी हिस्सेवार रक्कम मिळतेच.

गणेश गटाच्या पूर्वेस एक मैल गेल्यावर जुन्नर परिसरांतील जुन्यांत जुनी पांचचार लेणी आहेत. पण ती जाण्यास अवघड असून त्यांत विशेष असे काहीं नाही.

या सर्व उपरिनिर्दिष्ट लेण्यांच्यापेक्षाही ब्राह्मणी काळातील ऐहिक लेणीं जुन्नरपासून १८-२० मैलांवर पश्चिमेस नाणेघाटात आहेत. कल्याणपासून त्यांचे ४० मैल अंतर भरेल. कोकणच्या बाजूने घाटाची लांबी ३ मैल भरेल. वाटेंत शिंगरु पठार व गणेशस्थळ येथें भोकें पाडलेले झाकणाचे खोदीव रांजण व कराचे पैसे टाकण्यासाठी आहेत. घाटमाथ्यावरही तसेच आहेच. यांना जकातीचे रांजण म्हणतात. हे मध्ययुगीन असावेत.

*महाराष्ट्र परिचय, पान ४६१

*नाणेघाट-व-नानाचा आंगठा :

घाटाच्या तोंडाशी पश्चिमेकडे तोंड करुन उभ्या असलेल्या टेकाडास "नानाचा आंगठा" म्हणतात. तो शिवनेरी किल्ल्यावरुन दिसतो. नाना व गुणा असे दोन भाऊ होते. कोकणातून देशावर येण्यास "नानाच्या आंगठ्या"च्या दोन्ही बाजूंकडून दोघांस एक वर्षात रस्ते करण्यास जुन्नरच्या राजाने सांगितले. गुणानें दक्षिणेकडील रस्ता निम्म्यांपेक्षा अधिक तयार केला, पण वर्षा अखेर तो अपुर्ण राहिला. कारण वरचा भाग अवघड होता. उलट नानाची सुरुवात सावकाश व अवघड भागांतून होती. पण शेवटी त्याने रस्ता पूर्ण केला. म्हणून "नाना घाट" नांव पडले.

घाटाची नळी २५०' लांब x ७' ते १६' फूट रुंद आहे. खाली शिंगरु पठारावर एक टाकें आहे. वसिष्ठपुत्र चतुर्वर्ण सातकर्णी यांच्या राजवटीच्या तेराव्या वर्षी कामवन येथील दामघोष याने हे टाके खोदविले" असा त्यावर उल्लेख आहे. महाराष्ट्रांतील ऐहिक लेणें एकच एक घाटाच्या नळीच्या डाव्या अंगास आहे. हे सर्वात जुनें ब्राह्मणी लेणें असून सिमुक शातवाहनाचा मुलगा श्री. शातवर्णी व त्याची सून नायनिका हिनें हा लेख इ.स. पूर्व २२० च्या सुमारास कोरविला आहे. कोणी इ.स.पूर्व १०० समजतात. या लेखास देवकुल म्हणतात. त्यामध्ये सिमुकाचा पुतळा व इतर नातेवाईकांच्या प्रतिमा व नावे होती. आज त्यांचे फक्त पायच दिसतात. या लेखात प्रथम वैदिक व पौराणिक देवांना वंदन केलेले आहे. धर्म, इंद्र, चंद्र, सुर्य, मरुत् तसेच यम, वरुण, कुबेर, वासव या चार लोकपालांस शंकर्षण वासुदेव यांना व त्यानंतर अग्नघातपासून अश्वमेध यज्ञापर्यंत कमीत कमी २२ यज्ञांचा उल्लेख आहे. खेडी, हत्ती, घोडी, रथ, हजारो गाई, कार्षपण नाणी या देणग्यांचा उल्लेखही आहे. पुढें वेदिश्री या दक्षिणपंथाच्या राजाने नाणेघाट दुरुस्त केला व प्रवाशांसाठी विश्रांतिस्थाने तयार केली. या लेखावरुन इ.स.पूर्व ९० पासून बुद्धधर्मीय संस्कारावर वैदिक संस्काराचा पगडा या भागात होता असे दिसते.

इ.स. ४०० नंतरचे शिलालेख म्हणजे अरबी व पर्शियन भाषेंतील शिवकालांतील मुसलमानी शिलालेख आढळतात. किल्ल्यावरील कमान टाक्यावर, बालेकिल्ल्यावरील घुमटावर व जुन्नरमधील हरएक मशिदीत हे उठावाचे शिलालेख आढळतात. त्यामुळे मशिदी कालौघात नाहीशा होणार असे दिसते. बहुतेक ठिकाणी

*Eqigraphia Indo-Moslemica, 1933-34, supplement.

कुराणांतील वचनें आहेत असे दिसते. *ऐतिहासिक दृष्ट्या दगडघडी (इ.स. १६२३-२४), म्युनिसिपालिटी (१६७३-७४) लालवेशीजवळ घोडेपीर (दिवाण अहमद-मशीद इ.स. १५७८-७९) देशमुखवाडीजवळ गवंडीमशीद (१५८१), उर्दूशाळेजवळ मदारछल्ली मशीद व कमानटाका मशीद (१६२५) यावरही सन आहेत म्हणून महत्वाच्या म्हणता येतील. हमामवाडा, रोशनमशीद, हबशी घुमट, सय्यदवाडा, पीरजादेवाडा यावर कुराणांतील वचने आहेत.

नारायणगांव - पुणे-नाशिक महामार्गावरील प्रमुख शहर. पुणेपासून अंदाजे ९० कि.मी. अंतरावर वसलेली मुख्य बाजारपेठ. जवळच ४-५ कि.मी. अंतर पश्चिमेला विक्रम साराभाई आंतरराष्ट्रीय अर्थ सॅटेलाईट केंद्र. तर पुर्वेला जागतिक पातळीवर महत्त्व असणारी (जी.एम.आर.टी) दुर्बिन आहे. गावात पुरातन मुक्ताईचे मंदिर आहे. ब्रिटीश कालावधितील छोटा बंधारा मीना नदीवर आहे.

ओझर - जुन्नर व नारायणगांव यांपासून जवळ जवळ सारखेच अंतर असलेले हे अष्टविनायकांपैकीचे एक तीर्थक्षेत्र आहे. विघ्नहराचे सुंदर मंदिर आहे. तटबंदीच्या आत चारही बाजूस दीपमाळा आहेत. कुकडी नदीचा सुंदर किनारा आहे. कुकडी नदीवरील येडगांव धरणाच्या पाण्याचा फुगवटा येथपर्यंत येतो. यात्रेकरुंच्या निवासाची तसेच भोजनाची उत्तम व्यवस्था आहे.

असा हा शिवनेरी, जुन्नर व जुन्नरच्या परिसराचा सामाजिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक इतिहास.

दोन हजार वर्षापूर्वीचे चित्र डोळ्यांसमोर आणलें तर किती रम्य देखावा आढळेल. कोजागिरी पौर्णिमेच्या पिठूर चांदण्या रात्री सभोवतालच्या हिरव्यागार दाणेदार शेतावरील धुंद वाऱ्याच्या झुळकेवर मन डुलत असेल. घाट चढून दमून थकून येणाऱ्या लमाण्यांच्या तांड्यातील स्त्रीया पायांतील वाळ्यांचा आवाज, बैलांच्या गळ्यातील घंटानादास साथ देत असेल. मानमोड, अंबाअंबिका व शिवनेर यांच्या कुशीतील बौद्ध भिक्षूंनी आपापल्या गुहांतून दिवे लावले असतील. गावांतून सभोवार दृष्टी टाकली असता जणूं यक्ष नगरीतच आपण आहोत असाच भास व्हावा.

* * *

शिवनेरीच्या परिसरातील प्रेक्षणीय स्थळे

- किल्ले शिवनेरी – महाराष्ट्राचे अराध्य दैवत, छत्रपती शिवरायांची जन्मभूमी, डोंगरी किल्ला, जुन्नर शहरापासून ३ कि.मी. अंतरावर जुन्नरचे पश्चिमेस, गडावर जाण्यास कुसूर, वडजकडे जाणाऱ्या एस.टी. बसेसने पायथ्यापर्यंत जाता येते. खाजगी वाहने पहिल्या दरवाज्याजवळील वाहन तळापर्यंत जातात. पुढे मात्र पायीच गड चढावा लागतो.
- किल्ले जीवधन – जुन्नरचे पश्चिमेस घाटघर गावाजवळ हा डोंगरी किल्ला आहे. जुन्नरपासून सुमारे २५ कि.मी. अंतरावर घाटघर आहे. घाटघरहून पायी किल्ल्यावर जाता येते. घाटघर गावातून माहितगार वाटाडे मिळू शकतात. (जवळच नाणे घाट आहे.) जुन्नर घाटघर एस.टी. बस आहे.
- लेण्याद्री (कोरीव लेणी) – अष्टविनायकापैकी एक स्थान. जुन्नर पासून ६ कि.मी. अंतरावर, जुन्नरच्या उत्तरेस, डोंगरावर हे स्थळ आहे. जुन्नर व पुण्याहून लेण्याद्रीसाठी एस.टी. बस आहे. कुकडीनदीवरील नविन बांधलेल्या पुलामुळे जुन्नर लेण्याद्री अंतर ३ कि.मी. झाले आहे. पायथ्याशी निवासाची व भोजनाची सोय आहे.
- तुळजाबाई (कोरीव लेणी) – जुन्नरच्या पश्चिम उत्तरेस ३ कि.मी. अंतरावर ही लेणी आहेत. पायी किंवा खाजगी वाहनानेच तेथे जाता येते. रस्त्यातच पद्मावती देवीचे मंदिर व पद्मावती तळे लागते.
- अंबा अंबिका व भूतलिंगम् (कोरीव लेणी) – जुन्नरच्या दक्षिणेस साधारण ३ कि.मी. अंतरावर ही लेणी आहे. जुन्नरहून ज्ञानमंदिरकडे जाणाऱ्या एस.टी. बसने पायथ्यापर्यंत जाता येते.
- हबशी घुमट – विजापूरच्या गोल घुमटाची आठवण करून देणारा हा घुमट जुन्नर–शिरोली रस्त्याच्या कडेला मुख्य रस्त्यालगतच आहे. शिरोली, विघ्नहर साखर कारखान्याकडे जाणाऱ्या एस. टी. बसेस किंवा खाजगी वाहनांनी जाता येते.

- ओझर – अष्टविनायकापैकी एक स्थान. जुन्नर पासून ११ कि.मी. अंतरावर, जुन्नरच्या पूर्वेस येडगांव धरणाच्याजवळ कुकडी नदी किनाऱ्यावर आहे. नारायणगावहून एस.टी बसेस व खाजगी वाहने तसेच जुन्नरहूनही खाजगी वाहनांनी जाता येते. निवासाची व भोजनाची सोय आहे.
- पंचलिंग – जुन्नर शहराच्या पश्चिमेस हे प्राचीन शिवालय आहे. आत व बाहेर पाण्याची दोन कुंड आहेत. दर श्रावणी सोमवारी यात्रा भरते. जुन्नर वासियांचे आवडते ठिकाण.
- वरसुबाई–हरण टेकडी – पंचलिंगाचे थोडे पुढे वरसुबाई देवीचे मंदिर आहे. मंदिरासमोरच हरण टेकडी नावाची टेकडी आहे. दर मंगळवारी व शुक्रवारी तेथे गर्दी असते.
- सिद्धीविनायक मंदिर – प्राचीन मंदिरामध्ये ग्रामदैवत श्री सिद्धीविनायक मंदिर हे रविवार पेठेत आहे. दर संकष्टी चतुर्थीच्या दिवशी खूप भाविक मंदिरात जमतात. शंदूराचा उकल पडल्याने आतील पुरातन सर्वांग सुंदर मूर्ती आज पाहण्यास मिळते.
- जैन मंदिरे – तेली बुधवार पेठ व पणसुंबा पेठ येथे जैनांची प्राचीन मंदिर आहेत. पणसुंबातील शांतीनाथ भगवान चे मंदिर पूर्वी तलावात होते आता तो तलाव बुजला आहे.
- जामा मशिद, सय्यदवाडा, पिरजादेवाडा येथील मशिदी व दर्गा इतिहास प्रसिद्ध आहे. औरंगजेबाचे वास्तव्य काही काळासाठी शहरात होते.
- धरणे – कुकडी प्रकल्पाअंतर्गत माणिक डोह, वडज, येडगांव, पिंपळगांव जोगा, चिल्हेवाडी ही धरणे आहेत.

शिवनेरीचा परिसर पाहण्याचा उत्कृष्ठ काळ ऑगस्ट ते ऑक्टोबर पर्यंतचा. या काळात सृष्टी सर्वांगाने नटलेली असते. विशेषतः ऑगस्टमध्ये पावसाचा जोर काहीसा ओसरलेला असतो. तुरळक सरी शिंपडण करीत असतात. पावसाळी धबधबे वाहतच असतात. हे सर्व वर्णनातीत आहे. त्यासाठी ते प्रत्यक्ष अनुभवावे हेच खरे.

* * *



भारतरत्न महर्षि धोंडो केशव कर्वे यांचे न्यू स्कूल, जुन्नर भेटी प्रसंगी त्यांच्या समवेत गुरुवर्य रा. प. सबनीस तथा गुरुवर्य द. वा. मांडे व इतर

गुरुवर्य प्रिं. रा. प. सबनीस

गुरुवर्य द. वा. मांडे

स्वागत मूल्य : १०/- रु.